

# वाकडे शेपूट

(बिहारी लोककथा)

लेखिका : वायू नायडू
चित्रकार : मुग्धा शहा
अनुवाद : स्नेहलता दातार

# वाकडे शेपूट

बिहारी लोककथा




लेखिका : वायू नायडू

चित्रकार : मुग्धा शहा

अनुवाद : स्नेहलता दातार

ज्योत्स्ना प्रकाशन



बिहारची राजधानी आहे पाटणा. तिथे कालिया नावाचा एक चांभार व त्याची बायको स्वपन राहत होती. ते उत्तम जोडे बनवत असत. त्यांनी बनवलेले जोडे फार प्रसिद्ध होते. त्यांच्या जोड्यांना पुढे टोक असे व ते फार मजबूत असत. पाटण्यातले सगळे श्रीमंत लोक कालियाने बनवलेले जोडेच पसंत करत. त्या शहरात तसे खूप श्रीमंत लोक होते.

या जोड्यांचा चालताना 'कर कर' असा आवाज होत असे. त्या आवाजावरच जणू चालणाऱ्याची प्रतिष्ठा ठरत असे. त्यामुळे लल्लूभाईंनी नवीन जोडे घेतले की लखनभाईही नवीन जोडे बनवून घेत. मग कोणाच्या जोड्याचा आवाज जास्त यावर गावात चर्चा चाले. मग ते रस्त्यावरून जाताना सारे त्यांच्याकडे पाहत राहत.


लोक म्हणत असत की जितका माणूस जास्त कडक, तितके त्याचे जोडे जास्त वाजणारे असतात. जोड्यांच्या या आवाजामुळे अजून एक गोष्ट होत असे. बायको, मुलं आणि नोकरांना लांबून जोड्यांचा आवाज ऐकू येत असे. त्यांची चाहूल लागली की मुलं दंगा थांबवून शांत बसत आणि नोकर लगेच आवराआवर करून ठेवत.





जादूभाई हा गावातला असाच एक वजनदार माणूस होता. त्याने नुकतेच कालियाकडून नवे करकरीत जोडे बनवून घेतले होते. त्याला ते वापरायची घाई झाली होती. पण त्याआधी त्याने अंगणातली खाट पुढे ओढली आणि हुक्का जवळ ओढला. वेलची घातलेला गरमगरम कपभर मसाला चहा त्याने घोटघोट पीत संपवला. त्याचा पानसुपारीचा डबा आणायला त्याने भोलाला, त्याच्या नोकराला सांगितलं. आणि नंतर त्याने नवे जोडे ऐटीत पायात घातले.

इतक्यात अचानक जोराचा वारा आला आणि पडदे फडफडले. खिडक्यांची तावदाने आपटली आणि दरवाजे जोरात उघडले. भोला घराबाहेर आला. जादूभाई कुठेच दिसेना. भोला घाबरून गेला. पुन्हा सोसाट्याचा वारा आला आणि भोला भेलकांडत खाली पडला.



खाटेवरून निळ्या धुराचा एक ढग वर आला आणि पसरला. ते बघताना भोलाचे डोळे आश्चर्याने मोठे झाले. त्या धुराचे खालचे टोक त्या नव्या टोकदार जोड्यांतून निघालेले होते.

‘अरेच्या! हे तर जादूभाईंचे नवे जोडे. म्हणजे मालकांचं भूत झालं की काय? हाय राम!’ असं म्हणून भोला भीतीने बेशुद्ध पडला.

जादूभाई अचानक अदृश्य झाल्याची चर्चा गावात पुढे काही दिवस सुरू होती.




कालिया व स्वपन गंगा नदीच्या पलीकडच्या काठावर गरीब लोकांच्या वस्तीत राहत होती.

"मोठी गंमत आहे, नाही?" कालिया एके रात्री स्वपनला म्हणाला. "लोकांना जेव्हा नवीन जोडे हवे असतात तेव्हा ते नोकराला पाठवतात. त्यांचं काम करावं म्हणून गोडगोड बोलतात."

"हंऽऽ!" स्वपन म्हणाली.

"पण गंमत म्हणजे जेव्हा आपल्या कामाचे पैसे द्यायची वेळ येते, तेव्हा आपण कुठे राहतोय हे ते विसरतात. आपला चेहरा त्यांच्या लक्षात राहत नाही. आपल्याला त्यांच्या दाराशी खेटे घालायला लावतात आणि नाइलाजाने अगदी थोडेसे पैसे आपल्या हातावर टेकवतात."





''स्वपन, या गरिबीचा आता मला कंटाळा आलाय. मी त्या बाबतीत काहीतरी करायचं ठरवलं आहे.''


''म्हणे त्या बाबतीत काहीतरी करायचं ठरवलं आहे! असं तुम्ही आजपर्यंत बऱ्याच वेळा म्हणालात,'' स्वपन त्याची नक्कल करत म्हणाली.

''पण या वेळी मी खरंच काहीतरी करणार आहे,'' कालिया म्हणाला.

तो उठून उभा राहिला. त्याने कंदील उचलला आणि ज्योत मोठी केली. डोक्याला फडकं गुंडाळून तो घाईघाईने बाहेर पडला.

गुडूप अंधारात कंदील खालीवर होत होता आणि त्याचा उजेड कमीजास्त होत होता. पण निदान त्या उजेडात कालियाला रस्ता तरी दिसत होता.

कालिया देवदार वृक्षांच्या वनराईत पोचला. त्या अंधाऱ्या काळ्या रात्रीत एक लाल ठिपका त्याला दिसत होता. तो त्या दिशेने जाऊ लागला. तंबाखूच्या धुराचा जोरदार वास येत होता. एका झाडाला टेकून एक जटाधारी माणूस बसला होता. त्याच्या गळ्यात रुद्राक्षांची माळ होती. कालियाला जो लाल उजेडाचा ठिपका दिसत होता, ते त्या माणसाच्या बिडीचं पेटलेलं टोक होतं.





कालिया त्या माणसासमोर बसला. ''साधू महाराज, आपणच मला मदत करा. मला पैसे मिळवून देणारं एखादं भूत शोधून द्याल का जरा? मला या गरिबीचा अगदी वीट आलाय,'' कालिया म्हणाला.

''हंऽऽ! तुला फक्त एवढंच हवं आहे का?'' साधूने विचारलं.

''हो, हो!'' कालियाने उत्तर दिलं.

''ठीक आहे मग. आऽऽ रेऽऽ यूऽऽ!'' साधू महाराजांनी काही विचित्र आवाज करत तीन वेळा टिचक्या वाजवल्या.

एक निळसर धूर पसरला आणि एक भूत त्याच्याशेजारी त्या धुरात येऊन उभं राहिलं. त्या भुताच्या पायांना नागमोडी टोकदार जोडे होते. ''अरे, हा तर जादूभाई आहे!'' कालियाने आश्चर्यानं म्हटलं, कारण त्याने ते जोडे ओळखले होते. खरोखरच, ते भूत म्हणजे हरवलेला जादूभाईच होता.

''हं, काय?'' भूत गुरगुरलं. ''मी भूतराम आहे, तुझा सेवक. सांग, मी काय काम करू?''

''बऽऽ बऽऽ बाप रे!'' कालियाने घाबरून आवंढा गिळला. भुताचा आवाज ऐकून त्याच्या अंगावर काटा आला. हे काहीतरी विचित्रच झालं होतं. पण त्याने मनातले भीतीचे विचार बाजूला सारले व म्हटले, ''भूतरामजी, मला पैसे पाहिजेत. खूप पैसे. पण फसवायचं नाही हं कुणाला, हां!''

''बर्राय!'' भूतरामने जोरात उत्तर दिलं. ''मला काहीतरी काम करायला सांग तर मी तुला पैसे देईन. पण लक्षात ठेव, तू मला सतत काम पुरवलं पाहिजेस. त्यात जरा जरी दिरंगाई झाली तर मी तुला आणि तुझ्या बायकोलासुद्धा खाऊन टाकीन!'' तसं खरंच तो करील असा त्याचा चेहरा होता.

कालियाने क्षणभर विचार केला आणि म्हटलं, ''सध्या महुवाच्या बिया पेरण्याचा हंगाम आहे. जिथून सूर्य उगवतो तिथपासून, सूर्य मावळतो तिथपर्यंत तू बिया पेर.''

भूतरामने हवेतूनच कुठूनतरी सोन्याच्या मोहरांची एक पिशवी काढली आणि कालियाच्या हातात दिली. ''ह्या घ्या मोहरा, कालियाजी. तुम्ही मला काम सांगितल्याबद्दल हे पैसे.'' आणि तो धूर आणि धूळ यांच्या ढगात नाहीसा झाला.









"अरे बाप रे! इतके पैसे!" कालिया उद्गारला. त्याला आश्चर्यही वाटलं आणि थोडी भीतीदेखील वाटली. "ठीक, ही रक्कम किमान तीन महिने तरी नक्की पुरेल, तोपर्यंत भूतरामची पेरणी संपेल." कालिया पळतच घरी गेला.

दुसऱ्या दिवशी सकाळी स्वपन दचकून जागी झाली. "हा कसला आवाज आहे?" तिने कालियाला विचारलं. भांडी एकमेकांवर आपटल्यासारखा तो आवाज होता. तिथे भूतराम उभा होता. एकेका हातात एकेक भांडं घेऊन ते तो त्यांच्या अंगावर फेकण्याच्या तयारीत होता. स्वपन घाबरून किंचाळलीच.

"कुठे आहे कालिया? मी पेरणी केलीय," भूतराम गुरगुरला. "मला पुढचं काम सांग, नाहीतर..." भूतरामने खायला आल्यासारखा चेहरा केला. कालियाचा थरकाप झाला.

"बरं बरं! आम्हांला एवढं घाबरवायची काही गरज नाही!" स्वपनने ठसक्यात सांगितलं. "आता महुवाला फुलं येतील, मग बिया येतील. त्या जून झाल्या की त्यांचं तेल काढ. दिवाळीच्या सणासाठी लागेल ते." भूतरामने आणखी बऱ्याच मोहरांच्या थैल्या हवेतून काढल्या, आणि त्या जमिनीवर टाकत तो सांगितलेलं काम करायला सुसाट निघून गेला.




"किती हो घाबरट आहात तुम्ही!" स्वपन कालियाला म्हणाली, कारण तो अजून थरथरत होता. "बिया रुजून त्यांची झाडं होतील, फुलं येतील. मग बिया येतील, तोपर्यंत बरेच महिने लागतील."


"काही सांगता येत नाही," कालिया म्हणाला.

आणि दुपार होण्यापूर्वीच जणू काही ऋतू बदलत आहेत असं वाटू लागलं. अचानक महुवाच्या झाडांना फुलं दिसायला लागली. थोड्याच वेळात भूतराम परतला. "तेलाची पिंपं भरून तयार आहेत."

"बाप रे! आता हा आपल्याला खाऊन टाकणार. मला काहीतरी केलंच पाहिजे." कालिया धावतच त्या वनराईकडे गेला. तो ठेचकाळून पडत होता आणि वाटेत झुडपांत अडखळत होता. भूतराम त्याच्या पाठोपाठ येत होताच. कालिया झाडाजवळ गेला आणि त्या साधूच्या पायावर त्याने सपशेल लोटांगण घातलं.

"महाराज! साधू महाराज! मला वाचवा. हे भूत फार जबरदस्त आहे हो! त्याने ऋतूदेखील बदलले. त्याला कोणतं काम द्यावं ते मला सुचत नाही. मी आता काय करू?"






भूतराम कालियाच्या मागे फुणफुणत उभा होता. साधूने भूतरामकडे पाहिलं. नेमकं त्याच वेळेला एक कुत्र्याचं पिलू तिथे आलं. त्याची शेपटी वाकडी होती.

''आटप लवकर!'' भूतराम ओरडला, ''मला काहीतरी काम दे, नाहीतर...'' आता तो चिडला होता.

कालिया आणि साधूने त्या पिलाकडे पाहिलं. मग त्यांनी एकमेकांकडे पाहिलं आणि मान डोलावली. ''बराय भूतराम, हे कुत्र्याचं पिलू दिसतंय ना? ते पकड आणि त्याची शेपटी सरळ कर.''

''किती वेळ थांबवलंस मला,'' भूतरामने कुरकुर केली नि तो पिलामागे पळाला. ''अरेच्या, मी विसरलोच होतो की!'' असं म्हणून त्याने चार-सहा मोहरा कालियाकडे फेकल्या. ''या छोट्याशा कामाबद्दल इतकेच मिळतील,'' असं म्हणत तो पळाला.



भूतरामने पिलाला पकडलं आणि तो वडाच्या झाडाखाली बसला. झुइंग! त्याने शेपटी सरळ धरली. पण ज्या क्षणी तो पिलू हातातून सोडत असे, त्या क्षणी, बुइंग! ती शेपटी पुन्हा वाकडी व्हायची. त्याने पुन्हा शेपटी सरळ केली. झुइंग! पुन्हा ती वाकडी झाली. बुइंग!

झुइंग! बुइंग! झुइंग! बुइंग!



असे कित्येक तास, दिवस, आठवडे, महिने उलटले. ते कुत्र्याचं पिलू आता एक मोठा कुत्रा झालं होतं. पण ती वाकडी शेपटी काही सरळ होईना.


अनेक वर्षांनंतर कालियाच्या दारावर थाप पडली. तो आणि स्वपन आता एका छोट्याशा घरात राहत होते. खरं म्हणजे, तिथल्या सगळ्या लोकांनी आता छोटी टुमदार घरं बांधली होती. कालियानेच त्याच्या साऱ्या शेजाऱ्यांना मदत केली होती. तिथे झाडं, फुलं नि पक्षीही होते.


स्वपनने दार उघडलं. कालिया तिच्यामागेच होता. भूतराम तिथे निळसर धुरात उभा होता. थकून आता त्याचे केस पिकले होते.

''या कुत्र्याची शेपटी काही सरळ होत नाही. कालियाजी, स्वपनजी, हा कुत्रा तुम्हीच ठेवा आणि मी दिलेलं सारं काही तुम्ही ठेवा! मी पुन्हा कधीही काम मागणार नाही असं वचन देतो. मला आता घरी जाऊ द्या,'' भूतराम रडत म्हणाला.

''जरूर जा आणि तू आम्हांला आणि आमच्या मित्रांना जे काही दिलं आहेस त्याबद्दल आम्ही तुझे आभारी आहोत.''

कालिया पुन्हा साधूकडे गेला आणि आता भुताची मदत आपल्याला नको आहे, असं त्याने साधूला सांगितलं. साधू हसला आणि भूतराम झर्कन आपल्या गुप्त व सुरक्षित घरी परत गेला.





वाकडे शेपूट ही आहे बिहारची लोककथा. कालिया चांभार सुंदर जोडे बनवतो पण तो गरीब आहे. एक भूत त्याला श्रीमंत व्हायला मदत करतं. अट एवढीच की त्या भुताला सारखं कामात गुंतवायला हवं, नाहीतर ते कालियाला खाऊन टाकील.

यातली चित्रं लोकप्रिय मधुबनी शैलीवर आधारलेली आहेत. मधुबनी हा मिथिलातला जिल्हा आहे. या शैलीचं मूळ नाव मिथिला चित्रशैली. उत्तर बिहारमधल्या मिथिला भागातल्या स्त्रिया अशी चित्रं काढतात.
चित्रकार प्रथम बारीक तपशिलांसह चित्र काढतात व नंतर त्यात रंग भरतात.



ज्योत्स्ना प्रकाशन
'धवलगिरी', ४३०-३१ शनिवार पेठ, पुणे ४११०३०
मोहन बिल्डिंग, १६२ ज. शंकरशेठ मार्ग, गिरगाव, मुंबई ४०० ००४
www.jyotsnaprakashan.com

9788179251959